| | |
|---|---|
| MHWS090001332023 | दाखल दिनांक : ३०.०१.२०२३<br>नोंदणी दिनांक : ३०.०१.२०२३<br>निकाल दिनांक : १५.०५.२०२६<br>कालावधी : ०३., ०३म.,१५ दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौ.ख. क्र.१७/२०२३** **निशाण क्र.– ६७**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ५०१/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन,मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी,मानोरा<br>तालुका पोलीस स्टेशन,मानोरा |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | अनिल रामचंद्र मात्रे व इतर |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. टी. ए. खान पटेल |

**गुन्हयाचा तपशिल**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २१/०७/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | १३/०१/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १२/०३/२०२५ |
| दोषारोप निश्चित तारीख | १२/०३/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २६/०६/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | १५/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अनिल रामचंद्र मात्रे**<br>वयः ५३ वर्षे, धंदाः मजुरी<br>रा. ग्राम– विठोली,<br>ता.मानोरा, जि. वाशिम. | —— | —— | भा.दं.वि. कलम २७२, २७३, व अन्न पदार्थ व मानके कायदा चे कलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(डी), २७(३)(ई) अन्वये | निर्दोष सोडले | —— | —— |
| २. | **श्रीकृष्ण रघुनाथ राउत**<br>वयः ३० वर्षे, धंदाः मजुरी<br>रा. जुनी वसती, मानोरा. | | | | | | |
| ३. | **युनुस खान आलम खान**<br>वयः २४ वर्षे, धंदाः मजुरी | | | | | | |
| ४. | **प्रमोद नागोराव लोखंडे**<br>वयः २२ वर्षे, धंदाः मजुरी | | | | | | |
| ५. | **एकनाथ मारोती मांडीलकर**<br>वयः ४५ वर्षे, धंदाः मजुरी<br>रा. घाटीनगर, मानोरा. | | | | | | |
| ६. | **महेश गजानन वानखडे**<br>वयः २४ वर्षे, धंदाः मजुरी | | | | | | |
| ७. | **फैजान खान रफिक खान**<br>वयः २२ वर्षे, धंदाः मजुरी<br>रा. मानोरा, जि.वाशिम. | | | | | | |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक १५/०५/२०२६)

१. प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७२, २७३, व अन्न पदार्थ व मानके कायदा चे कलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(डी), २७(३)(ई) नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक २१/०७/२०२१ रोजीचे पुर्वी बसस्थानक समोर घडली होती. त्या दिवशी आरोपींनी महाराष्ट्र शानाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखुजन्य पदार्थाची साठवणुक करुन अवैधरित्या विक्री करीत असतांना मिळून आले. त्यांचेकडे मिळून आलेला मुद्देमाल जप्त करुन फिर्यादीने वरील कलमान्वये आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली.

३. पोलीसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र.५१०/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम २७२, २७३, व अन्न पदार्थ व मानके कायदा चे कलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(डी), २७(३)(ई) अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ व जप्तीपंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम २७२, २७३, व अन्न पदार्थ व मानके कायदा चे कलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(डी), २७(३)(ई) अन्वये नि.क्र.३० वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपीची जबानी निशाणी क्र.३१ ते ३७ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण तिन साक्षीदार, साक्षीदार क्र.१ इरफान शाहा (पंच), सा.क्र.२ मयुरेश रामप्रसाद तिवारी (पोलिस साक्षीदार) व सा.क्र.३ राजकुमार डिगांबर कुकडवाड (फिर्यादी) यांना तपासले आहे. अभियोगपक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांनी इतर साक्षीदार व तपास अधिकारी यांना पुराव्याकामी हजर केले नाही. त्या अनुषंगाने आदेश नि.क्र.१ वर आदेश पारीत करण्यात आला. आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण अनुक्रमे नि.क्र ४९ ते ५५ वर नोंदविण्यात आले.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की दिनांक २१/०७/२०२१ रोजी १७:२९ वाजताचे सुमारास मानोरा येथे आरोपींनी विना परवाना अनधिकृतपणे शासनाने प्रतिबंधित केलेला लोकांच्या जीवितास नुकसानकारक असलेला अन्नपदार्थ विक्री करीत असतांना मिळून आले व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम २७२ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी लोकांच्या जिवीतास अपायकारक असलेले अन्नपदार्थ विक्री केले व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम २७३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करतो काय की उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपी त्यांचे ताब्यात अनधिकृतपणे विनापरवाना शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ बाळगुन मिळून आले व तसे करुन अन्न पदार्थ व मानके कायदा चे कलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(डी), २७(३)(ई) अन्वये गुन्हा केला. | **...नाही** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबतः–**

७. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. सा.क्र.१ फिर्यादी यांनी घटनेची बाब त्यांनी त्यांची फिर्याद नि.क्र.६६ प्रमाणे घडल्याचे सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की, घटनेच्या दिवशी त्यांनी प्रत्यक्ष मानोरा हद्दीतील कथित घटनास्थळाची पाहणी करुन घटनास्थळ व जप्ती पंचनामे तयार केले व तसा अहवाल नि.क्र.४५ प्रमाणे दाखल केला. पुढे त्यांनी आरोपींनी वरील कायद्याचे कलमांतर्गत फिर्याद दाखल केली व जप्त नमुने रासायनिक विष्लेषणाकरीता पाठविण्यात आल्याचे सांगितले. सा.क्र.२ यांनीही वरील कार्यवाही त्यांचेसमक्ष करुन तपासणी अहवाल नि.क्र.४५ वर त्यांची सही असल्याचे सांगितले. परंतु वरील दोनही साक्षीदारांच्या साक्षेस स्वतंत्र साक्षीदार सा.क्र.१ यांनी पाठींबा दिलेला नाही. त्यांनी पंचनामा त्यांचेसमक्ष तयार करण्याची बाब स्पष्टपणे नकारली आहे.

८. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सा.क्र.१ यांनी कथन केलेल्या घटनेच्या शाबीतीकरीता अभियोगपक्षातर्फे पुरक कागदोपत्री व इतर स्वतंत्र पुरावा दाखल करण्यात आला नाही. प्रकरणात अभियोपपक्षास पुरेपुर संधी देवूनही प्रकरणातील इतर घटनास्थळ पंच, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तपास अधिकारी यांना पुराव्याकामी हजर केले नाही. तसेच प्रकरणात रासायनिक विष्लेषन अहवाल दाखल केलेला नाही. साक्षीदार व रासायनिक विष्लेषन अहवाला अभावी आरोपींविरुद्ध गुन्ह्याचे घटक सिद्ध होत नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ बाबतः–**

९. वरील सर्व बाबींचा तुलनात्मक पडताळणी केली असता असे दिसून येते की, आरोपींनी कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीने कथन केलेली घटना योग्य तोंडी व कागदोपत्री पुराव्या अभावी सिद्ध झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता,

१८६० चे कलम २७२, २७३, व अन्न पदार्थ व मानके कायदा चे कलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(डी), २७(३)(ई) मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणे पात्र आहे. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.४ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आ.क्र.१ **अनिल रामचंद्र मात्रे,** आ.क्र.२ **श्रीकृष्ण रघुनाथ राउत,** आ.क्र.३ **युनुस खान आलम खान,** आ.क्र.४ **प्रमोद नागोराव लोखंडे,** आ.क्र.५ **एकनाथ मारोती मांडीलकर,** आ.क्र.६ **महेश गजानन वानखडे व** आ.क्र.७ **फैजान खान रफिक खान** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम २७२, २७३, व अन्न पदार्थ व मानके कायदा चे कलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(डी), २७(३)(ई) अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. प्रकरणातील जप्त मुद्देमाल अन्न व औषध अधिकारी यांनी नियमाप्रमाणे अपिल कालावधीनंतर विल्हेवाट करावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.15 18:41:40 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), मानोरा

दि. १५/०५/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (Grade-III) |
| Court | - | Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 15/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 15/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 15/05/2026 |